# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## विकास परवाना/ बांधकाम परवाना बाबत

## जाहिर सुचना

अहमदनगर शहरातील तमाम नागरीकांना, जमिन धारकांना, व्यवसाय धारकांना, वास्तुविशारद इत्यादी व बांधकाम परवाने/ विकास परवाने / व्यवसायधारक व्यक्ती व संस्था यांनी कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासनाचे दिनांक 22 ऑगस्ट 2014 रोजीच्या अद्यादेशाद्वारे महाराष्ट्र जमिन महसुल संहिता 1966 चे कलम 42 मध्ये सुधारणा करण्यात येऊन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाद्वारे तयार व प्रसिध्द केलेल्या मंजूर विकास योजनेत निश्चित केल्याप्रमाणे कोणत्याही प्रयोजनाकरीता भोगवटादार वर्ग- 1 म्हणुन धारण केलेल्या कोणत्याही जमिनीच्या वापराचे रुपांतर करणेसाठी जिल्हाधिकारी यांच्या कोणत्याही पुर्व परवानगीची आवश्यता असणार नाही, अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

तथापि महानगरपालिकेकडून विकास तथा बांधकाम परवानगी देण्यापुर्वी संबधित जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा आणि त्यावरील भार याबाबत नियोजन प्राधिकरणाने म्हणजे महानगरपालिकेने महसुली प्राधिका-याकडून विनिश्चिती करुन घेणे क्रमप्राप्त आहे, आणि अशा प्रकारे विनिश्चिती करुन घेण्यासाठी महसुल जिल्हा प्रशासनाने (अ) सन.1950 ते आजपावेतोचे 7/12 उतारे व सर्व फेरफार नक्कल (ब) गाव नमुना 1 (क) आणि अँलिनेशन रजिष्टरची साक्षांकित प्रत अर्जासोबत प्राप्त करुन घेणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

तरी सर्व संबधितांनी विकास परवाना/बांधकाम परवानगीसाठी अर्ज करतांना जमिनीची विनिश्चिती प्रयोजनासाठी वरील कागदपत्रे विकास परवाना/ बांधकाम परवानगीसाठी अर्जासोबत महानगरपालिकेकडे सोबत सादर करावीत.

नगररचनाकार
अहमदनगर महानगरपालिका

मा. आयुक्त यांचे मान्यतेने